# महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभाग

विशेष राज्यकर आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, ३ रा मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

वाचा:- १. वित्त विभाग शासन निर्णय क्र. विकवि-१२११/प्र.क्र.२९१/ वि.प्र-४ मुंबई, दिनांक १८/११/२०११

२. या कार्यालयाचा आदेश क्र. अविआ / म.रा. / कार्यालय निहाय पदे / पुनर्रचना कक्ष / प्र.क्र.५८/ ब-३७८ मुंबई, दि. ०१/१२/२०११.

३. वित्त विभाग शासन निर्णय क्र. विकआ-१०११/प्र.क्र. ३६१/ वि.प्र-४ मुंबई, दिनांक १०/१/२०१२

४. या कार्यालयाचा आदेश क्र. अविआ / म.रा. / कार्यालय निहाय पदे / पुनर्रचना कक्ष / प्र.क्र.५८/ ब- ४०० मुंबई, दि. ११/०१/२०१२.

५. वित्त विभाग शा. नि.क्र विकआ-१०१४ / प्र.क्र. १६७ / वि.प्र. ४, दि. ०९/०५/२०१४

६. या कार्यालयाचा आदेश क्र. विविआ/म.रा./कार्या. निहायपदे/ गट-ड व इतर संवर्ग / प्र.क्र. १ / ब- ५६, दि. २४/०६/२०१४.

७. या कार्यालयाचा आदेश क्र. विविआ/म.रा./पुनर्रचना कक्ष/प्र.क्र.८८, दि.८/७/२०१६ व दि. २१/७/२०१६

८. या कार्यालयाचा आदेश क्र. विविआ/ आस्था -३/पुनर्रचना कक्ष/ कार्या. स्थाना./प्र.क्र.८७, दि. ९/५/२०१७.

९. या कार्यालयाचा आदेश क्र. विविआ/आस्था -३/पुनर्रचना कक्ष/ कार्या. स्थाना. /प्र.क्र. ८७, दि. १९/५/२०१७.

१०. या कार्यालयाचा आदेश क्र. विविआ/ आस्था -३/ पुनर्रचना कक्ष/ कार्या. स्थाना. /प्र.क्र. ८७, दि. १९/६/२०१७.

११. वित्त विभाग शासन निर्णय क्र. विकवि-१२१८/ प्र.क्र.६८/ वि.प्र. ४, दि. १३.०४.२०१८

१२. या कार्यालयाचा आदेश क्र. विविआ/आस्था -३/पुनर्रचना कक्ष/कार्या. स्थाना./ प्र.क्र. ८७, दि. १९/४/२०१८.

## कार्यालयीन आदेश

क्रमांक विविआ/ आस्था -३/ पुनर्रचना कक्ष/ कार्या. स्थाना. / प्र.क्र. ८७ मुंबई दिनांक 23 MAY 2018

**विषय:- दि.१९.०४.२०१८ च्या आदेशान्वये राज्यकर अधिकारी, राज्यकर निरीक्षक व कर सहायक या पदांचे एका कार्यालयातुन दुसऱ्या कार्यालयात स्थानांतरण झाल्याने सुधारीत प्रपत्र अ व ब निर्गमित करणेबाबत.**

१. संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयाव्दारे विक्रीकर विभागाच्या पुनर्रचनेच्या आढाव्याला मान्यता देवून एकुण ९८४२ मनुष्यबळ मंजूर करण्यात आले होते. त्यानंतर संदर्भ क्र. २ च्या कार्यालयीन आदेशान्वये कार्यालयनिहाय, कार्यशाखानिहाय व संवर्ग निहाय पदांचे वितरण करण्यात आले होते. त्या कार्यालयीन आदेशा सोबतच्या प्रपत्र- अ मध्ये मुख्य कर विषयक संवर्गातील पदांचे कार्यालयनिहाय, कार्यशाखानिहाय व संवर्ग निहाय पद वाटप दर्शविण्यात आले होते व प्रपत्र- ब मध्ये मुख्य कर विषयक संवर्गातील पदांची व इतर संवर्गातील पदांची पदनामे व महाविकास सांकेतांक दर्शविण्यात आले होते. तसेच संदर्भ क्र. ४ च्या कार्यालयीन आदेशान्वये, प्रपत्र- क मध्ये आहरण व संवितरण अधिकारीनिहाय पदवाटप तक्ते घोषित करण्यात आले होते. त्यानंतर सन २०१४ मध्ये वर्ग-ड व इतर किरकोळ संवर्गाचा आढावा शासनाने मंजुर

केल्यानंतर सुधारीत प्रपत्र अ, ब व क संदर्भ क्र. ६ च्या कार्यालयीन आदेशान्वये निर्गमित करण्यात आले होते. तसेच पालघर येथून भाईंदर येथे व धुळे येथून जळगाव येथे काही पदे स्थानांतरीत झाल्याने त्या कार्यालयांसाठी सुधारीत प्रपत्र अ, ब व क संदर्भ क्र. ७ मधील कार्यालयीन आदेशान्वये निर्गमित करण्यात आली होती. तद्नंतर संदर्भ क्र. ८ व ९ च्या कार्यालयीन आदेशान्वये विक्रीकर अधिकारी, विक्रीकर निरीक्षक व कर सहायक या पदांचे एका कार्यालयातुन दुसऱ्या कार्यालयात स्थानांतरण झाल्याने त्या संबधित कार्यालयांसाठी सुधारीत प्रपत्र अ, ब व क संदर्भ क्र. १० च्या आदेशान्वये निर्गमित करण्यात आले होते.

२. आता संदर्भ क्र. १२ च्या आदेशान्वये राज्यकर अधिकारी, राज्यकर निरीक्षक व कर सहायक या पदांचे एका कार्यालयातुन दुसऱ्या कार्यालयात प्रशासकीय कारणास्तव स्थानांतरण करण्यात आले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे पदे स्थानांतरीत झाली आहेत.

| अ.क्र | ज्या कार्यालयातून पदे स्थानांतरीत झाली आहेत ते कार्यालय व पदे | | | | ज्या कार्यालयात पदे स्थानांतरीत झाली आहेत ते कार्यालय व पदे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कार्यालय | रा. अ. | रा.नि. | क.स. | कार्यालय | रा. अ. | रा.नि. | क.स. |
| १ | २ | ३अ | ३ब | ३क | ४ | ४अ | ४ब | ४क |
| १ | पालघर | ३ | ६ | ३ | रायगड | ३ | ६ | ३ |
| २ | भाईंदर | ५ | १० | ५ | रायगड | ५ | १० | ५ |
| ३ | सोलापूर | ४ | ८ | ४ | पुणे | ४ | ८ | ४ |
| ४ | उस्मानाबाद | २ | ४ | २ | अहमदनगर | २ | ४ | २ |
| ५ | कोल्हापुर | ७ | १४ | ७ | मुंबई | ७ | १४ | ७ |
| ६ | धुळे | २ | ४ | २ | अहमदनगर | २ | ४ | २ |
| ७ | जळगांव | ४ | ८ | ४ | औरंगाबाद | ४ | ८ | ४ |
| ८ | नंदुरबार | २ | ४ | २ | जालना | २ | ४ | २ |
| ९ | नांदेड | ३ | ६ | ३ | लातूर | ३ | ६ | ३ |
| १० | नांदेड | ३ | ६ | ३ | पुणे | ३ | ६ | ३ |
| ११ | हिंगोली | २ | ४ | २ | पुणे | २ | ४ | २ |
| १२ | नागपूर | १० | २० | १० | पुणे | १० | २० | १० |
| १३ | अमरावती | २ | ४ | २ | खांमगांव | २ | ४ | २ |
| १४ | अमरावती | ६ | १२ | ६ | पुणे | ६ | १२ | ६ |
| १५ | यवतमाळ | २ | ४ | २ | पुणे | २ | ४ | २ |
| १६ | अकोला | २ | ४ | २ | पुणे | २ | ४ | २ |
| | **एकूण** | **५९** | **११८** | **५९** | | **५९** | **११८** | **५९** |

३. त्यामुळे स्तंभ क्र. २ व ४ मध्ये नमुद केलेल्या कार्यालयांसाठी प्रपत्र- अ (मुख्य कर विषयक संवर्गातील पदांचे कार्यालयनिहाय, कार्यशाखानिहाय व संवर्ग निहाय पद वाटप) व प्रपत्र- ब (मुख्य कर विषयक संवर्गातील पदांची व इतर संवर्गातील पदांची पदनामे व महाविकास सांकेतांक) नव्याने निर्गमीत करण्यासाठी आदेश पारीत करावा लागेल. स्तंभ क्र. २ मधील ज्या कार्यालयातून पदे स्थानांतरीत होत आहेत त्या कार्यालयासाठीच्या प्रपत्र अ व ब मध्ये पदे कमी करुन स्तंभ क्र. ४ मधील ज्या कार्यालयात पदे स्थानांतरीत झाली आहेत तेथे तितकीच पदे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

४. प्रपत्र- क (आहरण व संवितरण अधिकारीनिहाय पदवाटप तक्ते) स्वतंत्रपणे तयार करुन ती निर्गमित करण्यात येतील व त्यानंतर सेवार्थ प्रणालीत यथोचित बदल करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात येईल.

५. प्रपत्र- अ व ब तयार करतांना मुंबई विभागातील व पुणे विभागातील कार्यालयांमध्ये खालीलप्रमाणे नव्याने स्थानांतरीत झालेल्या पदांचे वाटप करण्यात आले आहे व त्यानुसार त्या कार्यालयांसाठीच्या प्रपत्रांमध्ये बदल करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | कार्यालय | रा. अ. | रा.नि. | क.स. |
|---|---|---|---|---|
| १ | व्यवसाय लेखा परीक्षण १ व २ (तक्ता क्र. ८) | २ | ४ | २ |
| २ | मुद्देनिहाय लेखापरिक्षण १ व २ (तक्ता क्र. १०) | ४ | ८ | ४ |
| ३ | परतावा व परतावा लेखापरिक्षण १ व २ (तक्ता क्र. ११) | १ | २ | १ |
| ४ | व्हॅट प्रशासन, पुणे (तक्ता क्र. २४) | १९ | ३८ | १९ |
| ५ | पुणे लेखापरिक्षण (तक्ता क्र. २५) | १० | २० | १० |

६. व्हॅट प्रशासन, पुणे (तक्ता क्र. २४) या कार्यालयात स्थानांतरीत होत असलेल्या १९ अधिकाऱ्यांपैकी , १० अधिकारी (सांकेतांक PUN-VAT-C-१२५ ते PUN-VAT-C-१३४), २० निरीक्षक व १० कर सहाय्यक यांच्यावर राज्यकर सहआयुक्त (व्यवसायकर) पुणे विभाग, पुणे [पुणे नोडल १] यांचे तर ९ अधिकारी (सांकेतांक PUN-VAT-C-३१० ते PUN-VAT-C-३१८), १८ निरीक्षक व ९ कर सहाय्यक यांच्यावर राज्यकर सहआयुक्त (व्हॅट प्रशा.) पुणे विभाग, पुणे [पुणे नोडल २] यांचे प्रशासकीय नियंत्रण राहील.

७. पुणे लेखापरिक्षण (तक्ता क्र. २५) या कार्यालयात स्थानांतरीत होत असलेल्या १० अधिकाऱ्यांपैकी , १ अधिकारी (सांकेतांक PUN-VAT-C-९१२), २ निरीक्षक व १ कर सहाय्यक यांच्यावर राज्यकर सहआयुक्त (व्यवसाय व लेखा ) पुणे [पुणे नोडल ३] यांचे तर ९ अधिकारी (सांकेतांक PUN-VAT-C-९१३ ते PUN-VAT-C-९२१), १८ निरीक्षक व ९ कर सहाय्यक यांच्यावर राज्यकर सहआयुक्त (परतावा व परतावा लेखा परीक्षण) पुणे [पुणे नोडल ४] यांचे प्रशासकीय नियंत्रण राहील.

८. या आदेशासोबत नव्याने निर्गमित करण्यात येत असलेल्या कार्यालयनिहाय प्रपत्र ब नुसार ज्या कार्यालयातील राज्यकर अधिकारी, राज्यकर निरीक्षक व कर सहायक यांचे स्थानांतरण होत आहे त्यांचे महाविकास संकेतांक दि. १ जुन, २०१८ पासून अकार्यरत (Deactivate) करणे व ज्या कार्यालयांमध्ये राज्यकर अधिकारी, राज्यकर निरीक्षक व कर सहायक यांची पदे स्थानांतरीत झालेली आहेत , त्या पदांसाठी पदांसाठी प्रपत्र ब मध्ये नव्याने निर्माण केलेले महाविकास संकेतांक दि. १ जुन, २०१८ पासून कार्यरत (Active) करणे ही कार्यवाही राज्यकर सहआयुक्त (महाविकास) यांनी करावी. फक्त यवतमाळ कार्यालयातील ज्या राज्यकर अधिकारी, राज्यकर निरीक्षक व कर सहायक यांचे स्थानांतरण होत आहे त्यांचे महाविकास संकेतांक दि. १ जुलै, २०१८ पासून अकार्यरत (Deactivate) करण्यात यावेत.

९. तसेच वस्तू व सेवा कर कायद्यांतर्गत नोंदीत असलेल्या व मुल्यवर्धीत कर कायद्यांतर्गत नोंदीत असलेल्या व्यापाऱ्यांच्या प्रकरणांचे (TIN) कार्यालयनिहाय व अधिकारीनिहाय फेरवाटप महाविकास शाखेने करावे.

१०. मुंबई व पुणे वगळता ज्या कार्यालयात नव्याने पदे स्थानांतरीत झाली आहेत त्या पदांचे नविन सांकेतांक, नियंत्रक राज्यकर सहआयुक्त व नियंत्रक राज्यकर उपायुक्त प्रपत्र अ मध्ये नमुद करण्यात आले आहेत. तरी त्यानुसार प्रशासकीय श्रृंखलेमध्ये (Hierarchy) होणारे बदल लक्षात घेवून राज्यकर सहआयुक्त (महाविकास) यांनी अधिकारी व कर्मचारी

यांचे संबंधीत डेस्क, त्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांचे डेस्क याबाबत महाविकास प्रणालीवर व SAP संगणक प्रणालीवर यथोचित बदल करावेत. मुंबई व पुणे येथे नव्याने स्थानांतरीत झालेल्या पदांचे नियंत्रक विक्रीकर उपायुक्त (प्रशासन) व विक्रीकर उपायुक्त (अपिले) यांच्याबाबत स्वतंत्ररित्या आदेश पारीत करण्यात येतील.

११. या आदेशाद्वारे नव्याने निर्गमित करण्यात येत असलेले कार्यालयनिहाय प्रपत्र- अ (मुख्य कर विषयक संवर्गातील पदांचे कार्यालयनिहाय, कार्यशाखानिहाय व संवर्ग निहाय पद वाटप) व प्रपत्र- ब (मुख्य कर विषयक संवर्गातील पदांची व इतर संवर्गातील पदांची पदनामे व महाविकास सांकेतांक) **दि. ०१ जुन, २०१८** पासून अंमलात येतील. यवतमाळ कार्यालयासाठीचे प्रपत्र अ व ब ,मात्र **दि. १ जुलै २०१८** पासून अंमलात येईल.

१२. सदर आदेश संदर्भ क्र.११ मधील शासन निर्णयाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

सोबत- प्रपत्र-अ, प्रपत्र-ब (सुधारीत व नवीन महाविकास सांकेतांकासह)

(राजीव जलोटा)
राज्यकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य

प्रत सादर,

१) मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)
३) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महराष्ट्र-१ मुंबई
५) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, मुंबई
६) सचिव (वित्त सुधारण), मंत्रालय, मुंबई
७) उपसचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

<u>प्रत रवाना:</u>

i. सर्व अपर राज्यकर आयुक्त
ii. सर्व राज्यकर सहआयुक्त
iii. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
iv. सर्व आहरण व संवितरण अधिकारी
v. राज्यकर उपआयुक्त, जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई
vi. कार्यासन अधिकारी, आस्थापना २/३/४/५/६ आयुक्तांचे कार्यालय मुंबई
vii. सर्व जिल्हा कोषागारे
viii. निवडनस्ती
ix. स्थळ प्रत.